I.O. प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड    **P.S.(ठाणे):** भोकर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0494    **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/12/2024 21:43

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार    **Date From (दिनांक पासून):** 19/12/2024
**Time Period (कालावधी):** पहर 5    **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/12/2024
**Time From (वेळेपासून):** 13:07 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 19/12/2024    **Time (वेळ):** 19:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 027
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/12/2024 20:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तालुका आरोग्य अधिकारी ,कार्यालय, भोकर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राहुल पांडुरंग चौदंते
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सेवक कंत्राटी नेमणुक, शहरी ,वर्धिनी केंद्र भोकर जि नांदेड,रा भिमनगर मुदखेड,भोकर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सेवक कंत्राटी नेमणुक, शहरी ,वर्धिनी केंद्र भोकर जि नांदेड,रा भिमनगर मुदखेड,भोकर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9604202391

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आशिष गंगाधर मोगले | | | 1. क्रत्रांटी, तालुका लेखापाल , नेमणुक तालुका आरोग्य अधिकारी ,कार्यालय, भोकर , भोकर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रु.दराच्या तीन चलनी नोटा | 1,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,500.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 19/12/2024

फिर्याद

मी राहुल पांडुरंग चौदंते वय 40 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद - सेवक (कंत्राटी) नेमणुक, शहरी आरोग्य वर्धिनी केंद्र भोकर जि. नांदेड रा. भिमनगर मुदखेड जि. नांदेड मोबाईल क्रमांक 9604202391.
समक्ष पो.स्टे.भोकर येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे राहणारा असून शहरी आरोग्य वर्धिनी केंद्र -1 भोकर येथे 15 वा वित आयोग योजने अंतर्गत कंत्राटी सेवक म्हणुन कार्यरत आहे. मी एसीबी नांदेड येथे दिनांक 04/12/2024 रोजी लेखी तक्रार दिली की, मी शहरी आरोग्य वर्धिनी केंद्र -1 भोकर येथे 15 वा वित आयोग योजने अंतर्गत कंत्राटी सेवक म्हणुन बोराडे इंजिनिअर्स औरंगाबाद या कंपनी मार्फत 01 जुन 2023 पासून कार्यरत होतो. बोराडे इंजिनिअर्स कंपनी औरंगाबाद यांचा जिल्हा परिषद नांदेड यांचेशी असलेला करार हा 31 जुलै रोजी संपला आहे. त्यामुळे 15 व्या वित योजने अंतर्गत बोराडे इंजिनिअर्स औरंगाबाद कंपनीचा करार संपल्यामुळे माझे सोबत सेवक म्हणुन लागलेले ईतर तीन सेवक मिळून जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. नांदेड व राष्ट्रीय आरोग्य अभियान जि.प. नांदेड चे अधिकारी यांनी आम्हाला तोंडी आदेशान्वये आम्ही ज्याठिकाणी काम करत आहोत त्याठिकाणी पुढील आदेशापर्यंत काम करत रहा असे सांगीतले. त्यामुळे मी व माझे सोबतचे सेवक हे नेमुन दिलेले ठिकाणी सेवक म्हणुन जि.प. नांदेड अंतर्गत आरोग्य विभागात काम करत आहोत. मी सद्या शहरी आरोग्य वर्धिनी केंद्र - 1 भोकर येथे सेवक म्हणुन काम करत आहे. तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय भोकर येथील लेखापाल श्री. आशिष मोगले यांनी मला माझे ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर महिण्याचा पगार काढण्यासाठी 4500/-रूपये लाचेची मागणी केली होती. मी केलेल्या कामाचा पगार काढण्यासाठी पैसे लागत नाहीत. परंतु मी लेखापाल आशिष मोगले यांना लाच दिली नाही तर ते माझे तीन महिण्याचा पगार काढणार नाहीत या भिती पोटी मी त्यांना 3000/- रूपये ऑक्टोबर महिण्यात दिले आहेत. लेखापाल श्री. आशिष मोगले यांनी मला दिनांक 03/12/2024 रोजी म्हणाले की, तुमचा माहे नोव्हेंबर महिण्याचा पगार काढायचा असेल तर मागील काढलेल्या पगाराचे उर्वरीत राहिलेले 1500/- रूपये दया, नाहीतर तुमचा चालू महिण्याचा पगार काढण्यासाठी अडचण जाईल. त्यावेळी मी त्यांना भितीपोटी होकार देवून नाईलाजास्तव आपले कडे तक्रार देण्यासाठी आलो आहे. माझा व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय भोकर येथील लेखापाल श्री. आशिष मोगले यांचेशी भांडण तंटा किंवा वैर नाही. तसेच त्यांचेशी माझा कोणत्याही प्रकारचा आर्थिक किंवा देवाण घेवाणीचा व्यवहार नाही. माझे कामासाठी लेखापाल आशिष मोगले किंवा ईतरा मार्फत लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी अशा आशयाची लेखी तक्रार दिली.
मी दिलेल्या तक्रारीवरून पोनि श्रीमती माधुरी यावलीकर मॅडम यांनी दोन शासकिय पंच नामे पंच 1 मनोज भाऊराव अवतारी पद- वरिष्ठ लिपीक, उध्व पैनगंगा प्रकल्प कार्यालय नांदेड व पंच -2 मोहम्मद जावेद शेख शमशीर पद- कृषी सहायक, जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी कार्यालय नांदेड यांना उपलब्ध करून घेतले. मी माझी तक्रार पंचाना तोंडी कथन करून लेखी तक्रार वाचण्यास दिली त्यानंतर पंचानी व पोनि यावलीकर मॅडम यांनी माझे तक्रारीवर सहया केल्या.
त्यानंतर लगेच सापळा कार्यवाहीसाठी पोनि माधुरी यावलीकर मॅडम, पोनि वाघमारे, दोन्ही पंच,



Scanned with CamScanner

सपोउपनि/मांजरमकर, पोहेकॉ/कणसे, पोहेकॉ/रसूल चापोहेकॉ/नामपल्ले असे लाप्रवि नांदेड येथून शा. वा. एमएच 26/आर 342 वेळ 14.50 वाजता रवाना होवून 15.50 वाजता भोकर येथे आलोत. त्यानंतर मी माझे जवळील मो.सा. माझे घरून व माझे नोव्हेंबर चे हजेरीपटाचे कागद आरोग्य वर्धीनी कार्यालयातून घेवून सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो.
त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांनी लाचमागणी पडताळणी कार्यवाहीत पोहेकॉ/कणसे यांना दिलेल्या सूचने वरून पोहेकॉ/कणसे यांनी मला व दोन्ही पंचाना डी.व्ही.आर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. त्यानंतर डी.व्ही.आर. मध्ये नविन मेमरी कार्ड टाकून त्यामध्ये माझे, पोनि यावलीकर मॅडम व दोन्ही पंचांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले.
त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांनी यांचे सुचनेवरुन पोहेकॉ/कणसे यांनी डी.व्ही.आर. 16.43 वा चालु करून माझे गळयात लटकविले. त्यानंतर मी व पंच क्र. 01 मनोज अवतारी असे लोकसेवक मोगले यांची भेट घेण्यासाठी टीएचओ कार्यालय, भोकर कडे माझे जवळील मो.सा.क्र. एम एच26 ए वाय 9948 ने रवाना झालोत. टीएचओ भोकर कार्यालयात लोकसेवक आशिष मोगले हे हजर होते. लोकसेवक आशिष मोगले यांनी मला यापुर्वी तीन महिण्याचे पगार बिल काढल्याचे मोबदला म्हणुन 4,500/- रुपये सांगितले होते. त्यापैकी 3,000/- रुपये यापुर्वीच लोकसेवक यांना मिळाल्याचे त्यांनी सांगुन उर्वरित राहिलेले 1,500/- रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना नोव्हेंबर 2024 चे हजेरी पटाचे कागद देवुन नोंव्हेबरचा पगार लवकर काढण्याची विनंती केली. त्यानंतर मी त्यांना किती वेळ ऑफीस मध्ये आहोत असे विचारले असता त्यांनी मला ते अर्धा तास कार्यालयात असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी व पंच असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत. त्यानंतर मी व पंचानी पोनि यावलीकर मॅडम यांना पडताळणी कार्यवाहीतील घडलेला घटनाक्रम सांगितला. त्यानंतर सापळा पथकाने डी. व्ही.आर. मधील पडताळणी कार्यवाहीतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांनी सापळा कार्यवाही अजमाविण्याचे सांगितले. त्यावेळी त्यांना विनंती केली की, लोकसेवक हे आता कार्यालयातुन निघुन गेली असतील ते आता आपल्याला भेटणार नाहीत असे म्हणुन मी त्यांना आजची कार्यवाही स्थगीत करण्याची विनंती केली. लोकसेवक आशिष मोगले हे कार्यालयात आल्याचे समजताच मी आपणास उद्या दिनांक 05/12/2024 रोजी कॉल करतो तेव्हा आपण पथकासह भोकर येथे येवुन लोकसेवकावर सापळा कार्यवाही करावी.
दिनांक 05/12/2024 रोजी मी पोनि यावलीकर मॅडम यांना फोनद्वारे माहिती दिली की, दिनांक 04/12/2024 रोजी संध्याकाळी माझा चुलत भाऊ याचे अपघाती निधन झाले आहे. त्यांचा अंत्यवीधी व पुढील विधी कामासाठी मला थांबावे लागणार असल्याने सध्या सापळा कार्यवाही तुर्तास काही दिवस स्थगित करावी.
त्यानंतर दिनांक 10/12/2024 रोजी मी पोनि यावलीकर मॅडम यांना फोनद्वारे माहिती दिली की, लोकसेवक मोगले आज कार्यालयात येणार आहेत. आपण सापळा पथकासह भोकर येथे यावे. त्यावरुन पोनि यावलीकर मॅडम हे सापळा पथकासह भोकर येथे आले.
त्यानंतर सापळा पुर्व व सापळा कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली. सापळा पुर्व कार्यवाहीत मोगले यांनी मला मागणी केलेली 1,500/- रुपये (ज्यात 500 रू. दराच्या 03 भारतीय चलनी नोटा) रक्कम जमा केली. त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांचे सुचनेवरुन सापळा पथकातील पोशि/रापतवार यांनी शासकीय वाहनात मला, दोन्ही पंचाना ऑथ्रासिन पावडर चे गुणधर्म व अल्ट्राव्हायलेट लॅम्प माहिती सांगुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले. त्यानंतर पो.नि.यावलीकर मॅडम यांनी सापळा कार्यवाहीचे अनुशंगाने मला, दोन्ही पंचास तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. तसेच लोकसेवक मोगले यांनी माझेकडुन ऑथ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर कोणता ईशारा करायचा ते सांगीतले. त्यानंतर माझी पंचाकरवी अंगझडती घेण्यात आली. पोशि/रापतवार यांनी 1,500/- रूपये ज्यात 500 रू. दराच्या 03 भारतीय चलनी नोटा घेवुन त्यास ऑथ्रासिन पावडर लावुन माझे अंगात परिधान केलेल्या शर्टच्या समोरील डाव्या बाजुचे खिशात ठेवुन दिली. त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांचे सुचनेवरुन सपोउपानि/मांजरकर यांनी मला डी.व्ही.आर. 13.00 वा चालु करून माझे गळयात लटकविले. त्यानंतर मी व पंच क्र. 01 मनोज अवतारी असे लोकसेवक मोगले यांना लाचेची रक्कम देण्यसासाठी टीएचओ कार्यालय, भोकर कडे माझे जवळील मो.सा.क्र. एम एच 26 बी डब्लु 1735 ने रवाना झालोत. आमचे पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले. मी टीएचओ कार्यालयात गेल्यानंतर तेथे मोगले यांचे कॅबीन कडे गेलो.मोगले कार्यालयात हजर नव्हते. त्यामुळे मी तेथील सेवकास मोगले यांची विषयी विचारपुस केली. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, मोगले हे साहेबां सोबत कॅम्पासाठी बाहेर गावी गेले आहेत. त्यामुळे मी व पंच नियोजित इशारा न करता तेथुन निघालोत. आमचे पाठोपाठ सापळा पथक आले. त्यानंतर सपोउपनि/मांजरमकर यांनी माझे गळ्यातील डी.व्ही.आर. बंद केले. त्यावेळी पोनि यावलीकर मॅडम यांनी मला व पंचास सापळा कार्यवाहीत घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी मी त्यांना मोगले कार्यालयात हजर नसल्याचे सांगुन ते येईपर्यंत



Scanned with CamScanner

आपण त्यांची वाट पाहु अशी विनंती केली. त्यानंतर मी वेळोवेळी मोगले हे कार्यालयात हजर आले आहेत का याचा कानोसा घेतला परंतु मोगले हे कार्यालयात आले नाहीत. त्यामुळे मी पोनि यावलीकर मॅडम यांना विनंती केली की, मोगले हे आता कार्यालयात येणार नाहीत त्यामुळे आपण सापळा कार्यवाही स्थगित करावी. मोगले हे ज्या दिवशी कार्यालयात हजर येतील त्या दिवशी मी आपणास फोनद्वारे माहिती देतो आपण त्या दिवशी सापळा पथकासह भोकर येथे येवुन मोगले यांचेवर सापळा कार्यवाही करावी.
आज दिनांक 19/12/2024 रोजी मी पोनि यावलीकर मॅडम यांना संपर्क करुन मोगले हे आज कार्यालयात येणार आहेत आपण सापळा पथकासह भोकर येथे यावे. त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम, पंच व सापळा पथक असे शासकीय वाहनाने भोकर येथे आले. मी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी गेलो. त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांचे सुचनेवरुन पोशी/रापतवार यांनी 1,500/- रूपये ज्यात 500 रू. दराच्या 03 भारतीय चलनी नोटा किट मधील पाकीटातुन काढुन त्यास ॲथ्रासीन पावडर लावुन माझे अंगात परिधान केलेल्या शर्टच्या समोरील डाव्या बाजुचे खिशात ठेवुन दिली. त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांनी सापळा पथकातील सदस्यांना त्यांचे कामाबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांचे सुचनेवरुन सपोउपनि/मांजरमकर यांनी डी.व्ही.आर. 13.07 वा चालु करून माझे गळयात लटकावुन दिला. त्यानंतर मी व पंच क्र. 01 मनोज अवतारी असे मोगले यांना लाचेची रक्कम देण्यासाठी टीएचओ कार्यालय, भोकर कडे माझे जवळील मो.सा.क्र. एम एच 26 बी वाय 5807 ने रवाना झालोत. आमचे पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले. मी व पंच क्रं. 01 अवतारी असे टीएचओ कार्यालयात गेल्यानंतर तेथे मोगले व इतर व्यक्ती हे काम करत होते. मी, मोगले यांना इशारा करुन तालुका आरोग्य अधिकारी यांचे कॅबीनकडे गेलो. त्यानंतर मी त्यांना कॉल केला. त्यांनी कॉल उचलुन कट केला. त्यानंतर मोगले हे तालुका आरोग्य अधिकारी यांचे कॅबीनकडे आले. त्यावेळी मी पंचासमक्ष मोगले यांना आपले ठरल्याप्रमाणे ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर तीन महिण्याचे असे बोलत माझे जवळील लाचेची रक्कम 1,500/- दिली. त्यावेळी मोगले यांनी लाचेची रक्कम पंचासमक्ष मोजुन घेवुन ती त्यांनी त्यांच्या अंगावरील शर्टच्या समोरील डावे बाजुच्या खिशात ठेवुन आलेत असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच असे कार्यालयाच्या बाहेर येवुन मोगले यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी सापळा पथकातील सदस्यांनी आशिष मोगले यांना लाचेच्या रक्कनेसह पंचासमक्ष ताब्यात घेतले. त्यानंतर सपोउपनि मांजरमकर यांनी माझ्याजवळील डी.व्ही.आर. ताब्यात घेवुन 13.30 वा. बंद केला . त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांनी आशिष मोगले यास त्यांचा व सापळा पथकातील सदस्यांचा परिचय दिला. आशिष मोगले यास त्याचे नाव गाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्याचे नाव आशिष गंगाधर मोगले वय 28 वर्ष व्यवसाय नोकरी पद - कंत्राटी तालुका लेखापाल नेमणुक टीएचओ कार्यालय, भोकर रा. सखोजी नगर, नांदेड असे सांगितले.
लोकसेवक आशिष गंगाधर मोगले वय 28 वर्ष व्यवसाय नोकरी पद - कंत्राटी तालुका लेखापाल नेमणुक टीएचओ कार्यालय, भोकर रा. सखोजी नगर, नांदेड यांनी मला माझे माहे ऑगस्ट 2024, सप्टेंबर 2024 व ऑक्टोंबर 2024 या ती महिण्याचे पगार बिल काढल्याचे मोबदला म्हणुन 4,500/- रुपयाची मागणी करुन माझेकडुन यापुर्वी 3,000/- रुपये स्विकारले. दिनांक 04/12/2024 रोजी पडताळणी कार्यवाहीत पं दिनांक 19/12/2024
फिर्याद
मी राहुल पांडुरंग चौदंते वय 40 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद - सेवक (कंत्राटी) नेमणुक, शहरी आरोग्य वर्धिनी केंद्र भोकर जि. नांदेड रा. भिमनगर मुदखेड जि. नांदेड मोबाईल क्रमांक 9604202391.
समक्ष पो.स्टे.भोकर येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे राहणारा असून शहरी आरोग्य वर्धिनी केंद्र -1 भोकर येथे 15 वा वित आयोग योजने अंतर्गत कंत्राटी सेवक म्हणुन कार्यरत आहे. मी एसीबी नांदेड येथे दिनांक 04/12/2024 रोजी लेखी तक्रार दिली की, मी शहरी आरोग्य वर्धिनी केंद्र -1 भोकर येथे 15 वा वित आयोग योजने अंतर्गत कंत्राटी सेवक म्हणुन बोराडे इंजिनिअर्स औरंगाबाद या कंपनी मार्फत 01 जुन 2023 पासून कार्यरत होतो. बोराडे इंजिनिअर्स कंपनी औरंगाबाद यांचा जिल्हा परिषद नांदेड यांचेशी असलेला करार हा 31 जुलै रोजी संपला आहे. त्यामुळे 15 व्या वित योजने अंतर्गत बोराडे इंजिनिअर्स औरंगाबाद कंपनीचा करार संपल्यामुळे माझे सोबत सेवक म्हणुन लागलेले ईतर तीन सेवक मिळून जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. नांदेड व राष्ट्रीय आरोग्य अभियान जि.प. नांदेड चे अधिकारी यांनी आम्हाला तोंडी आदेशान्वये आम्ही ज्याठिकाणी काम करत आहोत त्याठिकाणी पुढील आदेशापर्यंत काम करत रहा असे सांगीतले. त्यामुळे मी व माझे सोबतचे सेवक हे नेमुन दिलेले ठिकाणी सेवक म्हणुन जि.प. नांदेड अंतर्गत आरोग्य विभागात काम करत आहोत. मी सद्या शहरी आरोग्य वर्धिनी केंद्र - 1 भोकर येथे सेवक म्हणुन काम करत आहे. तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय भोकर येथील लेखापाल श्री. आशिष मोगले यांनी मला माझे ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर महिण्याचा पगार काढण्यासाठी 4500/-रूपये लाचेची मागणी केली होती. मी केलेल्या कामाचा पगार काढण्यासाठी पैसे लागत नाहीत. परंतु मी लेखापाल आशिष



Scanned with CamScanner

मोगले यांना लाच दिली नाही तर ते माझे तीन महिण्याचा पगार काढणार नाहीत या भिती पोटी मी त्यांना 3000/- रूपये ऑक्टोबर महिण्यात दिले आहेत. लेखापाल श्री. आशिष मोगले यांनी मला दिनांक 03/12/2024 रोजी म्हणाले की, तुमचा माहे नोंव्हेंबर महिण्याचा पगार काढायचा असेल तर मागील काढलेल्या पगाराचे उर्वरीत राहिलेले 1500/- रूपये दया, नाहीतर तुमचा चालू महिण्याचा पगार काढण्यासाठी अडचण जाईल. त्यावेळी मी त्यांना भितीपोटी होकार देवून नाईलाजास्तव आपले कडे तक्रार देण्यासाठी आलो आहे. माझा व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय भोकर येथील लेखापाल श्री. आशिष मोगले यांचेशी भांडण तंटा किंवा वैर नाही. तसेच त्यांचेशी माझा कोणत्याही प्रकारचा आर्थिक किंवा देवाण घेवाणीचा व्यवहार नाही. माझे कामासाठी लेखापाल आशिष मोगले किंवा ईतरा मार्फत लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी अशा आशयाची लेखी तक्रार दिली.

मी दिलेल्या तक्रारीवरून पोनि श्रीमती माधुरी यावलीकर मॅडम यांनी दोन शासकिय पंच नामे पंच 1 मनोज भाऊराव अवतारी पद- वरिष्ठ लिपीक, उध्व पैनगंगा प्रकल्प कार्यालय नांदेड व पंच -2 मोहम्मद जावेद शेख शमशीर पद- कृषी सहायक, जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी कार्यालय नांदेड यांना उपलब्ध करून घेतले. मी माझी तक्रार पंचाना तोंडी कथन करून लेखी तक्रार वाचण्यास दिली त्यानंतर पंचानी व पोनि यावलीकर मॅडम यांनी माझे तक्रारीवर सहया केल्या.

त्यानंतर लगेच सापळा कार्यवाहीसाठी पोनि माधुरी यावलीकर मॅडम, पोनि वाघमारे, दोन्ही पंच, सपोउपनि/मांजरमकर, पोहेकॉ/कणसे, पोहेकॉ/रसूल चापोहेकॉ/नामपल्ले असे लाप्रवि नांदेड येथून शा. वा. एमएच 26/आर 342 वेळ 14.50 वाजता रवाना होवून 15.50 वाजता भोकर येथे आलोत. त्यानंतर मी माझे जवळील मो.सा. माझे घरून व माझे नोव्हेंबर चे हजेरीपटाचे कागद आरोग्य वर्धीनी कार्यालयातून घेवून सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो.

त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांनी लाचमागणी पडताळणी कार्यवाहीत पोहेकॉ/कणसे यांना दिलेल्या सूचने वरून पोहेकॉ/कणसे यांनी मला व दोन्ही पंचाना डी.व्ही.आर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. त्यानंतर डी.व्ही.आर. मध्ये नविन मेमरी कार्ड टाकून त्यामध्ये माझे, पोनि यावलीकर मॅडम व दोन्ही पंचांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांनी यांचे सुचनेवरुन पोहेकॉ/कणसे यांनी डी.व्ही.आर. 16.43 वा चालु करून माझे गळयात लटकविले. त्यानंतर मी व पंच क्र. 01 मनोज अवतारी असे लोकसेवक मोगले यांची भेट घेण्यासाठी टीएचओ कार्यालय, भोकर कडे माझे जवळील मो.सा.क्र. एम एच26 ए वाय 9948 ने रवाना झालोत. टीएचओ भोकर कार्यालयात लोकसेवक आशिष मोगले हे हजर होते. लोकसेवक आशिष मोगले यांनी मला यापुर्वी तीन महिण्याचे पगार बिल काढल्याचे मोबदला म्हणुन 4,500/- रुपये सांगितले होते. त्यापैकी 3,000/- रुपये यापुर्वीच लोकसेवक यांना मिळाल्याचे त्यांनी सांगुन उर्वरित राहिलेले 1,500/- रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना नोव्हेंबर 2024 चे हजेरी पटाचे कागद देवुन नोंव्हेबरचा पगार लवकर काढण्याची विनंती केली. त्यानंतर मी त्यांना किती वेळ ऑफिस मध्ये आहोत असे विचारले असता त्यांनी मला ते अर्धा तास कार्यालयात असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी व पंच असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत. त्यानंतर मी व पंचानी पोनि यावलीकर मॅडम यांना पडताळणी कार्यवाहीतील घडलेला घटनाक्रम सांगितला. त्यानंतर सापळा पथकाने डी.व्ही.आर. मधील पडताळणी कार्यवाहीतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांनी सापळा कार्यवाही अजमाविण्याचे सांगितले. त्यावेळी त्यांना विनंती केली की, लोकसेवक हे आता कार्यालयातुन निघुन गेली असतील ते आता आपल्याला भेटणार नाहीत असे म्हणुन मी त्यांना आजची कार्यवाही स्थगीत करण्याची विनंती केली. लोकसेवक आशिष मोगले हे कार्यालयात आल्याचे समजताच मी आपणास उद्या दिनांक 05/12/2024 रोजी कॉल करतो तेव्हा आपण पथकासह भोकर येथे येवुन लोकसेवकावर सापळा कार्यवाही करावी.

दिनांक 05/12/2024 रोजी मी पोनि यावलीकर मॅडम यांना फोनद्वारे माहिती दिली की, दिनांक 04/12/2024 रोजी संध्याकाळी माझा चुलत भाऊ याचे अपघाती निधन झाले आहे. त्यांचा अंत्यवीधी व पुढील विधी कामासाठी मला थांबावे लागणार असल्याने सध्या सापळा कार्यवाही तुर्तास काही दिवस स्थगित करावी.

त्यानंतर दिनांक 10/12/2024 रोजी मी पोनि यावलीकर मॅडम यांना फोनद्वारे माहिती दिली की, लोकसेवक मोगले आज कार्यालयात येणार आहेत. आपण सापळा पथकासह भोकर येथे यावे. त्यावरुन पोनि यावलीकर मॅडम हे सापळा पथकासह भोकर येथे आले.

त्यानंतर सापळा पुर्व व सापळा कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली. सापळा पुर्व कार्यवाहीत मोगले यांनी मला मागणी केलेली 1,500/- रुपये (ज्यात 500 रू. दराच्या 03 भारतीय चलनी नोटा) रक्कम जमा केली. त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांचे सुचनेवरुन सापळा पथकातील पोशि/रापतवार यांनी शासकीय वाहनात मला, दोन्ही



Scanned with CamScanner

पंचाना ॲंथ्रासिन पावडर चे गुणधर्म व अल्ट्राव्हायलेट लॅम्प माहिती सांगुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले. त्यानंतर पो.नि.यावलीकर मॅडम यांनी सापळा कार्यवाहीचे अनुशंगाने मला, दोन्ही पंचास तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. तसेच लोकसेवक मोगले यांनी माझेकडुन ॲंथ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर कोणता ईशारा करायचा ते सांगीतले. त्यानंतर माझी पंचाकरवी अंगझडती घेण्यात आली. पोशि/रापतवार यांनी 1,500/- रूपये ज्यात 500 रू. दराच्या 03 भारतीय चलनी नोटा घेवुन त्यास ॲंथ्रासिन पावडर लावुन माझे अंगात परिधान केलेल्या शर्टच्या समोरील डाव्या बाजुचे खिशात ठेवुन दिली. त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांचे सुचनेवरुन सपोउपानि/मांजरकर यांनी मला डी.व्ही.आर. 13.00 वा चालु करुन माझे गळ्यात लटकविले. त्यानंतर मी व पंच क्र. 01 मनोज अवतारी असे लोकसेवक मोगले यांना लाचेची रक्कम देण्यसासाठी टीएचओ कार्यालय, भोकर कडे माझे जवळील मो.सा.क्र. एम एच 26 बी डब्लु 1735 ने रवाना झालोत. आमचे पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले. मी टीएचओ कार्यालयात गेल्यानंतर तेथे मोगले यांचे कॅबीन कडे गेलो.मोगले कार्यालयात हजर नव्हते. त्यामुळे मी तेथील सेवकास मोगले यांची विषयी विचारपुस केली. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, मोगले हे साहेबां सोबत कॅम्पासाठी बाहेर गावी गेले आहेत. त्यामुळे मी व पंच नियोजित इशारा न करता तेथुन निघालोत. आमचे पाठोपाठ सापळा पथक आले. त्यानंतर सपोउपनि/मांजरमकर यांनी माझे गळ्यातील डी.व्ही.आर. बंद केले. त्यावेळी पोनि यावलीकर मॅडम यांनी मला व पंचास सापळा कार्यवाहीत घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी मी त्यांना मोगले कार्यालयात हजर नसल्याचे सांगुन ते येईपर्यंत आपण त्यांची वाट पाहु अशी विनंती केली. त्यानंतर मी वेळोवेळी मोगले हे कार्यालयात हजर आले आहेत का याचा कानोसा घेतला परंतु मोगले हे कार्यालयात आले नाहीत. त्यामुळे मी पोनि यावलीकर मॅडम यांना विनंती केली की, मोगले हे आता कार्यालयात येणार नाहीत त्यामुळे आपण सापळा कार्यवाही स्थगित करावी. मोगले हे ज्या दिवशी कार्यालयात हजर येतील त्या दिवशी मी आपणास फोनद्वारे माहिती देतो आपण त्या दिवशी सापळा पथकासह भोकर येथे येवुन मोगले यांचेवर सापळा कार्यवाही करावी.

आज दिनांक 19/12/2024 रोजी मी पोनि यावलीकर मॅडम यांना संपर्क करुन मोगले हे आज कार्यालयात येणार आहेत आपण सापळा पथकासह भोकर येथे यावे. त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम, पंच व सापळा पथक असे शासकीय वाहनाने भोकर येथे आले. मी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी गेलो. त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांचे सुचनेवरुन पोशी/रापतवार यांनी 1,500/- रूपये ज्यात 500 रू. दराच्या 03 भारतीय चलनी नोटा किट मधील पाकीटातुन काढुन त्यास ॲंथ्रासीन पावडर लावुन माझे अंगात परिधान केलेल्या शर्टच्या समोरील डाव्या बाजुचे खिशात ठेवुन दिली. त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांनी सापळा पथकातील सदस्यांना त्यांचे कामाबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांचे सुचनेवरुन सपोउपानि/मांजरमकर यांनी डी.व्ही.आर. 13.07 वा चालु करुन माझे गळयात लटकावुन दिला. त्यानंतर मी व पंच क्र. 01 मनोज अवतारी असे मोगले यांना लाचेची रक्कम देण्यासाठी टीएचओ कार्यालय, भोकर कडे माझे जवळील मो.सा.क्र. एम एच 26 बी वाय 5807 ने रवाना झालोत. आमचे पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले. मी व पंच क्र. 01 अवतारी असे टीएचओ कार्यालयात गेल्यानंतर तेथे मोगले व इतर व्यक्ती हे काम करत होते. मी, मोगले यांना इशारा करुन तालुका आरोग्य अधिकारी यांचे कॅबीनकडे गेलो. त्यानंतर मी त्यांना कॉल केला. त्यांनी कॉल उचलुन कट केला. त्यानंतर मोगले हे तालुका आरोग्य अधिकारी यांचे कॅबीनकडे आले. त्यावेळी मी पंचासमक्ष मोगले यांना आपले ठरल्याप्रमाणे ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर तीन महिण्याचे असे बोलत माझे जवळील लाचेची रक्कम 1,500/- दिली. त्यावेळी मोगले यांनी लाचेची रक्कम पंचासमक्ष मोजुन घेवुन ती त्यांनी त्यांच्या अंगावरील शर्टच्या समोरील डावे बाजुच्या खिशात ठेवुन आलेत असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच असे कार्यालयाच्या बाहेर येवुन मोगले यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी सापळा पथकातील सदस्यांनी आशिष मोगले यांना लाचेच्या रक्कमेसह पंचासमक्ष ताब्यात घेतले. त्यानंतर सपोउपनि मांजरमकर यांनी माझ्याजवळील डी.व्ही.आर. ताब्यात घेवुन 13.30 वा. बंद केला . त्यानंतर पोनि यावलीकर मॅडम यांनी आशिष मोगले यास त्यांचा व सापळा पथकातील सदस्यांचा परिचय दिला. आशिष मोगले यास त्याचे नाव गाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्याचे नाव आशिष गंगाधर मोगले वय 28 वर्ष व्यवसाय नोकरी पद - कंत्राटी तालुका लेखापाल नेमणुक टीएचओ कार्यालय, भोकर रा. सखोजी नगर, नांदेड असे सांगितले.

लोकसेवक आशिष गंगाधर मोगले वय 28 वर्ष व्यवसाय नोकरी पद - कंत्राटी तालुका लेखापाल नेमणुक टीएचओ कार्यालय, भोकर रा. सखोजी नगर, नांदेड यांनी मला माझे माहे ऑगस्ट 2024, सप्टेंबर 2024 व ऑक्टोंबर 2024 या ती महिण्याचे पगार बिल काढल्याचे मोबदला म्हणुन 4,500/- रुपयाची मागणी करुन माझेकडुन यापुर्वी 3,000/- रुपये स्विकारले. दिनांक 04/12/2024 रोजी पडताळणी कार्यवाहीत पंचासमक्ष सदर रक्कमेतील उर्वरित 1,500/- रुपये लाचेची मागणी करुन ती आज दिनांक 19/12/2024 रोजी करण्यात आलेल्या सापळा



Scanned with CamScanner

कार्यवाहीत पंचासमक्ष टीएचओ कार्यालय, भोकर येथे स्वतः स्विकारली आहे. म्हणुन माझी आशिष गंगाधर मोगले कंत्राटी लेखापाल यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही,

(राहुल पांडुरंग चौदंते)
रा. भीम नगर मुदखेड

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

AJIT POPAT KUMBHAR(I (Inspector)) / 12401003905APKM8301D

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with CamScanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

पोलिस ठाणे अमलदार
पोलिस ठाणे भाकर

**Name (नाव):** AJIT POPAT KUMBHA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 12401003905APKM830

Scanned with CamScanner